# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

केंद्र क्र. १, १३ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र,
कफ परेड, कुलाबा, मुंबई-४०० ००५
दूरध्वनीः ०२२-२२१६ ३९६४/६५/६९ फॅक्सः ०२२-२२१६ ३९७६
ई-मेल: mercindia@merc.gov.in वेब-साईट www.mercindia.org.in/www.merc.gov.in

## अधिसूचना (प्रारुप)

### विद्युत अधिनियम, २००३

**क्रमांक मविनिआ/-----/२०१९/--- -** विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ८६ (३) आणि १८१ नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा तसेच या संबंधात त्यास समर्थ करणाऱ्या अन्य सर्व अधिकारांचा वापर करुन आणि पूर्व प्रसिध्दीनंतर, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग याद्वारे 'महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण मुक्त प्रवेश) विनियम, २०१६' ('मुख्य विनियम') या विनियमांमध्ये सुधारणा करण्यासाठी खालील विनियम करीत आहे :

**१. संक्षिप्त शीर्षक आणि प्रारंभ**

१.१ या विनियमांना "महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण मुक्त प्रवेश) (पहिली सुधारणा) विनियम, २०१९" असे म्हणावे.

१.२ हे विनियम **शासकीय राजपत्रातील** त्यांच्या प्रसिध्दीच्या दिनांकापासून अंमलात येतील.

**२. मुख्य विनियमांच्या विनियम २ मध्ये सुधारणा**

मुख्य विनियमांच्या विनियम २ मधील व्याख्यांमध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येतीलः-

> "(४) **"बॅंकींग"** म्हणजे विनियम २० मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या दिवसाच्या त्याच काल-गटात वापराचे समायोजन केल्यानंतर, वितरण परवानाधारकाकडे जमा करण्यात आलेली आणि ग्रिडमध्ये अंतःक्षेपण केलेली शिल्लक नूतनशील ऊर्जा;
>
> "(१७) **"करारांतर्गत मागणी"** म्हणजे किलोव्होल्ट ॲम्पिअर (केव्हीए) किंवा मेगाव्होल्ट ॲम्पिअर (एमव्हीए) मधील विजेची मागणी जी वितरण परवानाधारक आणि ग्राहक यांच्यात परस्पर संमतीने, (एक) वीज पुरवठ्याच्या करारात किंवा (दोन) अन्य लेखी पत्रव्यवहारात, मान्य करण्यात आलेली असेल;"
>
> **"(२०)(ए) "ग्रॉस मिटरींग"** म्हणजे एक अशी मिटरींग व्यवस्था ज्यामध्ये सौर पीव्ही यंत्रणेद्वारा निर्माण झालेली संपूर्ण ऊर्जा, आंतरजोडणी मानकांनुसार अनुज्ञेय तांत्रिक

मर्यादांच्या अधीन राहून, विद्युत ग्रिडमध्ये टाकण्यात येते आणि यंत्रणेच्या मालकास आयोगाकडून मान्यता मिळालेल्या किंवा स्वीकृत केलेल्या दराने वितरण परवानाधारकाला सौर ऊर्जेची विक्री केल्यामुळे लाभ होतो.

"(२२) **"दीर्घ-कालिन मुक्त प्रवेश"** म्हणजे सात वर्षांपेक्षा जास्त कालावधीकरीता वितरण यंत्रणेचा वापर करण्याचा हक्क;"

"(२४) **"मध्यम-कालिन मुक्त प्रवेश"** म्हणजे तीन महिन्यांपेक्षा जास्त परंतु पाच वर्षांपेक्षा जास्त नसेल अशा कालावधीकरीता वितरण यंत्रणेचा वापर करण्याचा हक्क;"

"(३९) **"काल-गट"** म्हणजे रात्री ००.०० वाजता प्रथम सुरु होणारा वेळेचा प्रत्येकी १५ मिनिटांचा गट किंवा केंद्रीय आयोग आणि राज्य आयोगाकडून अधिसूचित करण्यात येईल असा अन्य अल्प कालावधी, ज्यामध्ये विशेष ऊर्जा मीटर्स विनिर्दीष्ट करण्यात आलेले विद्युत मापदंड आणि परिमाण यांची नोंद करतात."

## ३. मुख्य विनियमांच्या विनियम ३ मध्ये सुधारणाः

विद्यमान विनियम ३.२ खालीलप्रमाणे बदलण्यात येईलः

"३.२ या विनियमांतील तरतुदींच्या अधीन राहून, जर ग्राहकाची एखाद्या वितरण परवानाधारकाकडे १ मेगाव्होल्ट ॲम्पिअर (एमव्हीए) आणि अधिक करारांतर्गत मागणी असेल तर सदर ग्राहक खालील एक किंवा अधिक संस्थांकडून किंवा त्यांच्या संयोगा (कॉम्बिनेशन) कडून, ज्या सर्वांना सामुदायिकपणे 'स्त्रोत' म्हणून संबोधण्यात येते, वीज पुरवठा घेण्याकरीता मुक्त प्रवेशासाठी पात्र राहीलः-

अ) स्व-वापरासाठीच्या निर्मिती प्रकल्पांसह वीज निर्मिती प्रकल्प किंवा केंद्रे;
ब) परवानाधारक वीज व्यापारी;
क) पॉवर एक्स्चेंज;
ड) अन्य वितरण परवानाधारक;
इ) अन्य कोणतेही स्त्रोत,

परंतु असे की, मेगा व्होल्ट ॲम्पिअर पासून मेगावॅट किलोवॅट मध्ये रुपांतर करण्याच्या प्रयोजनासाठी युनिटी पॉवर फॅक्टर विचारात घेण्यात येईल;

परंतु आणखी असे की, अंशतः मुक्त प्रवेश ग्राहकाला अर्जाच्या दिवशी वितरण परवानाधारकाशी असलेल्या त्याच्या विद्यमान करारांतर्गत मागणीपेक्षा जास्त नसणाऱ्या क्षमतेसाठी मुक्त प्रवेश घेण्याची परवानगी देण्यात येईल, तर पूर्णतः मुक्त प्रवेश ग्राहकाला त्याच्या मंजूर भारापेक्षा जास्त नसणाऱ्या क्षमतेसाठी मुक्त प्रवेश घेण्याची परवानगी देण्यात येईल;

परंतु असेही की, वितरण फ्रॅन्चायसीच्या क्षेत्रात स्थित असलेला ग्राहक देखील मुक्त प्रवेशासाठी पात्र राहील;

परंतु असेही की, वितरण फ्रॅन्चायसी मुक्त प्रवेशासाठी पात्र राहणार नाही, परंतु एक ग्राहक म्हणून तो पात्र राहील;

परंतु असेही की, ज्या ग्राहकाला अथवा व्यक्तीला मुक्त प्रवेश मंजूर करण्यात येत असेल त्याची त्यानंतरच्या प्रत्येक आर्थिक वर्षातील कमाल मागणी ही तो ज्या पातळीवर मुक्त प्रवेशाला पात्र झाला असेल त्या पातळीच्या सत्तर (७०) टक्के इतकी किंवा त्याहून अधिक असली पाहिजे;

परंतु असेही की, जर ग्राहक त्यानंतरच्या कोणत्याही महिन्यात अशी कमाल मागणी साध्य करु शकला नाही तर, अशी कमाल मागणी ज्या आर्थिक वर्षात किंवा त्याच्या भागात तो साध्य करु शकला नसेल त्यामधील वहन आकारांच्या दुप्पट दंड आकारण्याचा वितरण परवानाधारकाला हक्क राहील;

परंतु असेही की, जर ग्राहक किंवा व्यक्ती ३ लागोपाठच्या महिन्यात वरील तरतुदीची पूर्तता करु शकली नाही तर, वितरण परवानाधारक करारांतर्गत मागणीचे फेर-निर्धारण आणि पूर्ववत किंवा कपात करण्याची प्रक्रिया सुरु करु शकेल.

परंतु आणखी असेही की, छपरावरील सौर फोटो व्होल्टॅक यंत्रणा घेऊ इच्छिणारा ग्राहक या विनियमांतर्गत एकाच वेळी मुक्त प्रवेश प्राप्त करु शकतो; अशा प्रकरणी अट लागू राहील की, ग्राहकाकडून ज्या कालावधीसाठी मुक्त प्रवेश प्राप्त करण्यात येतो त्या कालावधीसाठी सौर निर्मितीसाठीचे क्रेडीट ग्रॉस मिटरींग तत्त्वावर समायोजित करण्यात येईल.

## ४. मुख्य विनियमांच्या विनियम ४ मध्ये सुधारणाः

विद्यमान विनियम ४.२ खालीलप्रमाणे बदलण्यात येईलः

“दीर्घ-कालिन मुक्त प्रवेश किंवा मध्यम -कालिन मुक्त प्रवेश घेणाऱ्या ग्राहकाच्या करारांतर्गत मागणीचे नियमन विद्युत पुरवठा संहितेमधील तरतुदींनी आणि कामगिरीच्या मानकांचे नियमन करणाऱ्या आयोगाच्या विनियमांनी करण्यात येईल, यासाठी ही अट लागू राहील की, जेथे विनियम ३.१ अंतर्गत पात्र असलेला ग्राहक निर्मिती कंपनी किंवा परवानाधारकाकडून किंवा पॉवर एक्स्चेंजच्या माध्यमातून पुरवठा घेण्यासाठी, वितरण परवानाधारकाच्या वितरण यंत्रणेमध्ये दीर्घ-कालिन मुक्त प्रवेश किंवा मध्यम-कालिन मुक्त प्रवेश किंवा अल्प-कालिन मुक्त प्रवेशाकरिता अर्ज करतो, तेव्हा वितरण परवानाधारक (ज्याच्या वितरण यंत्रणेवर प्रवेश मागण्यात येतो) मुक्त प्रवेशाच्या माध्यमातून मागणी करण्यात आलेल्या हस्तांतरित करावयाच्या विजेच्या परिमाणाच्या मर्यादेपर्यंत करारांतर्गत मागणीत घट करील.

परंतु असे की, अल्प-कालिन मुक्त प्रवेश घेणाऱ्या ग्राहकाच्या करारांतर्गत मागणीच्या बाबतीत, ग्राहकाने मुक्त प्रवेशाच्या वाढीसाठी विनिर्दिष्ट कालमर्यादेत अर्ज केला नसल्यास, अल्प-कालिन मुक्त प्रवेशाचा कालावधी समाप्त झाल्यावर मुक्त प्रवेशासाठी अर्ज करण्याच्या वेळी असणारी मूळ करारांतर्गत मागणी पूर्ववत राखण्यात येईल.”

## ५. मुख्य विनियमांच्या विनियम ५ मध्ये सुधारणाः

ए. विद्यमान विनियम ५.१०.४ मध्ये खालीलप्रमाणे नवीन परंतुकाची भर घालून बदलण्यात येईलः

> “५.१०.४ “नूतनशील ऊर्जा स्त्रोतांवर आधारित निर्मिती केंद्रे वगळता, अन्य निर्मिती केंद्र किंवा संचाकडून अशा अनिश्चित विजेची वाणिज्यिक हाताळणी, तफावतीच्या हिशोबपूर्तीच्या कार्यपध्दतीचे नियमन करणाऱ्या आयोगाच्या विनियमांत विनिर्दिष्ट करण्यात येईल त्याप्रमाणे होईल आणि ही अनिश्चित विजेची वाणिज्यिक हाताळणी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (तफावतीच्या हिशोबपूर्तीची कार्यपध्दती आणि संबंधित बाबी) विनियम, २०१९ नुसार अधिसूचित करण्यात यावयाच्या प्रभावी दिनांकापासून लागू होईल.
>
> परंतु असे की, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (तफावतीच्या हिशोबपूर्तीची कार्यपध्दती आणि संबंधित बाबी) विनियम, २०१९ नुसार अंमलात यावयाच्या दिनांकाच्या अशा अधिसूचनेपर्यंत निर्मिती केंद्रामधून अनिश्चित विजेसाठीच्या अशा चाचणीच्या आकाराचे आणि वीज दराचे नियमन, नूतनशील ऊर्जेवर आधारित निर्मिती केंद्रे वगळता, बहु-वर्षीय वीज दराचे नियमन करणाऱ्या आयोगाच्या विनियमांत विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे होईल.

बी. विनियम ५.१०.४ च्या विद्यमान परंतुकामध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येईलः

"परंतु आणखी असे की, निर्मिती केंद्राकडून अशा चाचणीमुळे ग्रिड्मध्ये अंतःक्षेपण करण्यात येणाऱ्या विजेचे दर आयोगाकडून निश्चित करण्यात आले नसतील तर ते खालीलपैकी जे कमी असेल त्यानुसार असतील;"

सी. विद्यमान विनियम ५.१०.५ मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येईलः

"५.१०.५ महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (तफावतीच्या हिशोबपूर्तीची कार्यपध्दती आणि संबंधित बाबी) विनियम, २०१९ नुसार प्रभावी दिनांकाच्या अधिसूचनेपर्यंत, अनिश्चित विजेचे अंतःक्षेपण करण्यापूर्वी, निर्मिती केंद्र अशा विजेचा पुरवठा करण्यासाठी वितरण परवानाधारकाबरोबर करार करील.

परंतु असे की, निर्मिती केंद्राने विजेच्या विक्रीसाठी कोणत्याही परवानाधारकाबरोबर करार केलेला नसेल तर ग्रिडमध्ये अंतःक्षेपण केलेल्या अशा अनिश्चित विजेसाठी कोणताही आकार आकारण्यात येणार नाही, आणि परवानाधारकाकडून या विजेचे समायोजन संबंधित महिन्याच्या कालावधीसाठी संबंधित वितरण परवानाधारकाच्या **मेरीट ऑर्डर स्टॅक** नुसार औष्णिक निर्मिती केंद्राच्या सर्वात कमी अस्थिर खर्चाच्या सममूल्य दराने करण्यात येईल आणि ही अनिश्चित वीज, निर्मिती केंद्र ज्या वितरण परवानाधारकाला जोडलेले असेल, त्याच्या खाती जमा करण्यात येईल.

डी. विनियम ५.१०.५ च्या विद्यमान पहिल्या परंतुकाखाली नवीन दुसऱ्या परंतुकाची भर घालण्यात येईल**:**

परंतु असेही की, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (तफावतीच्या हिशोबपूर्तीची कार्यपध्दती आणि संबंधित बाबी) विनियम, २०१९ नुसार प्रभावी दिनांकानंतर, अस्थिर विजेच्या अंतःक्षेपणासाठीची अट आणि त्याच्या हाताळणीचे नियमन महाराष्ट्रासाठी तफावतीच्या हिशोबपूर्तीच्या कार्यपध्दतीचे नियमन करणाऱ्या विनियमांनुसार करण्यात येईल."

## ६. मुख्य विनियमांच्या विनियम ७ मध्ये सुधारणाः

विनियम ७.२ च्या विद्यमान परंतुकामध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येईलः

"७.२. मुक्त प्रवेशाचे वर्गीकरण त्याच्या कालावधीच्या आधारे करण्यात येईलः-

| मुक्त प्रवेशाची वर्गवारी | कालावधी |
|---|---|
| **दीर्घ-कालिन मुक्त प्रवेश** | सात वर्षांपेक्षा जास्त |
| **मध्यम-कालिन मुक्त प्रवेश** | तीन महिन्यांपेक्षा जास्त परंतु पाच वर्षांपेक्षा जास्त नसेल |
| **अल्प-कालिन मुक्त प्रवेश** | एक महिन्यांपेक्षा जास्त नसेल |

परंतु असे की, अर्जदार पाच वर्षे आणि सात वर्षांच्या मधील कालावधीसाठी, एका वेळेस जास्तीत जास्त एका वर्षांकरिता मध्यम-कालिन मुक्त प्रवेशाची मागणी करु शकेल."

## ७. मुख्य विनियमांच्या विनियम ८ मध्ये सुधारणाः

ए. विनियम ८.१ च्या पहिल्या परंतुकाच्या वर खालीलप्रमाणे नवीन परंतुकाची भर घालण्यात येईलः

"परंतु असे की, नोडल एजन्सी, केवळ ऑनलाईन पध्दतीने अर्जाचे शुल्क स्वीकारण्यासह, अल्प-कालिन मुक्त प्रवेश आणि मध्यम-कालिन मुक्त प्रवेशासाठीच्या अर्जावर कार्यवाही करील. नोडल एजन्सी कार्यपध्दतीमध्ये योग्य त्या सुधारणा करुन तीन महिन्यांच्या आत सुरक्षित प्रदान गेटवेसह ऑनलाईन प्रक्रियेसाठीची आवश्यक ती वेब-पोर्टल कार्यात्मकता प्रस्थापित करील. या सॉफ्टवेअरमध्ये संपूर्ण प्रक्रियेच्या दिवस किंवा वेळेचे मुद्रांकन होणे आवश्यक असेल आणि या प्रक्रियेची माहिती यंत्रणेमध्ये देखील उपलब्ध असेल.

बी. विद्यमान विनियम ८.१० वगळण्यात आले आहे.

~~"८.१० नोडल एजन्सी, जर परिणामस्वरुप निर्माण होणारा विद्युत प्रवाह हा विद्यमान वितरण यंत्रणेमध्ये किंवा कार्यान्वित करावयाच्या वितरण यंत्रणेमध्ये सामावून घेणे शक्य असेल तर, मध्यम कालिन किंवा अल्प कालिन मुक्त प्रवेश मंजूर करील."~~

सी. विद्यमान विनियम ८.११ ला ८.१० म्हणून पुनःअंकित करण्यात येईल.

"८.१० वितरण परवानाधारक या विनियमांच्या अधिसूचनेनंतर जोडणीयतेकरिता आणि मुक्त प्रवेशाकरीता अर्ज ऑन-लाईन सादर करण्याची सुविधा या विनियमांच्या अधिसूचनेपासून नव्वद दिवसांच्या आत उपलब्ध करुन देईल."

## ८. मुख्य विनियमांच्या विनियम ११ मध्ये सुधारणाः

डी. विनियम ११.३ मध्ये दोन नवीन परंतुकांची भर घालण्यात येईलः

"परंतु असे की, डे-अहेड मुक्त प्रवेशाच्या मंजुरीसाठीचा अर्ज सतत किमान ८ तासांच्या कालावधीसाठी किंवा आयोगाने स्वतःहून काढलेल्या किंवा बाधित पक्षकाराने केलेल्या अर्जाच्या आधारावर वेळोवेळी काढलेल्या स्वतंत्र आदेशाच्या माध्यमातून ठरवून देण्यात आलेल्या काल-गटांच्या अशा अन्य कालावधीसाठी करण्यात येईल.

"परंतु आणखी असे की, वरील मागण्यात आलेल्या डे अहेड मुक्त प्रवेशावर दिलेले वेळापत्रक किमान आठ तासांच्या कालावधीसाठी समान राहील आणि कोणत्याही वेळी दिवसभरातील किमान वेळापत्रक दिवसाच्या कमाल वेळापत्रकाच्या ७५ टक्क्यांपेक्षा कमी असणार नाही."

## ९. मुख्य विनियमांच्या विनियम १४ मध्ये सुधारणाः

ए. विनियम १४.१(पाच) च्या विद्यमान परंतुकामध्ये सुधारणा करण्यात येईल आणि त्याखाली तीन नवीन परंतुकांची खालीलप्रमाणे भर घालण्यात येईलः

**"१४.१ (पाच) पारेषण आकार :**

"परंतु असे की, अंशकालीन मुक्त प्रवेश ग्राहक, निर्मिती केंद्र किंवा परवानाधारक, जसे असेल तसे, हे पारेषण जाळयाच्या वापरासाठी पारेषण आकार पारेषण परवानाधारकाऐवजी वितरण परवानाधारकाला अदा करतील, हे आकार विनियम १४.५ अंतर्गत विनिर्दिष्ट केल्यानुसार ठरवून दिलेल्या कालमर्यादेत राज्य पारेषण कंपनीला देण्यात येतील;

परंतु असे की, वारंवार होणाऱ्या अल्प-कालिन मुक्त प्रवेश व्यवहारांना परावृत्त करण्यासाठी, मुक्त प्रवेश ग्राहकांच्या अशा वारंवार होणाऱ्या अल्प-कालिन मुक्त प्रवेश व्यवहारांच्या प्रकरणी लागू असलेले अल्प-कालिन मुक्त प्रवेश आकार आर्थिक वर्षादरम्यान प्रत्येक दुसऱ्या, तिसऱ्या आणि चौथ्या अल्प-कालिन मुक्त प्रवेशासाठी अनुक्रमे १.२५, १.५ आणि २.० च्या पटीने वाढविण्यात येतील त्यानंतर अल्प-कालिन मुक्त प्रवेशासाठीचे आकार मान्यता दिलेल्या अल्प-कालिन मुक्त प्रवेश आकारांच्या दुप्पट निश्चित करण्यात येतील;

परंतु आणखी असे की, मध्यम-कालिन मुक्त प्रवेश आणि अल्प-कालिन मुक्त प्रवेश व्यवहारांवर आधारीत नूतनशील ऊर्जेसाठी लागू असलेले पारेषण आकार प्रति युनिट तत्त्वावर राहतील, **हे पारेषण आकार मान्यता दिलेल्या अल्प-कालिन मुक्त प्रवेश आकारांच्या दुपटीच्या सममूल्य राहतील हा अपवाद राहील.**

**परंतु असेही की, अल्प-कालिन मुक्त प्रवेश प्राप्त करणारे अंशतः मुक्त प्रवेश ग्राहक, जरी ते ज्या वीजनिर्मात्याकडून वीज घेत आहेत त्या वीजनिर्मात्यांनी राज्य पारेषण कंपनीशी ठोक वीज पारेषण करार केला असला किंवा नसला तरी, पारेषण आकार अदा करण्यास जबाबदार राहतील.**

बी. विद्यमान विनियम १४.६(ब) मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येईलः

**“१४.६ वहन आकार**

**ब)** “ग्राहक किंवा निर्मिती केंद्र जर थेट पारेषण यंत्रणेला जोडलेले असतील किंवा ते ग्राहक किंवा निर्मिती केंद्राच्या मालकीच्या असलेल्या समर्पित वाहिन्यांचा वापर करीत असतील **आणि जर अशा समर्पित वाहिन्या वितरण यंत्रणेशी कोणतीही आंतरजोडणी न करता निर्मिती केंद्रापासून भार केंद्रापर्यंत थेट** *(पॉईंट टू पॉईंट)* **पारेषण करण्यासाठी किंवा विजेच्या वहन करण्यासाठी वापरण्यात येत असतील तरच केवळ, त्यांना वहन आकार लागू होणार नाहीत.”**

सी. नवीन खंड १४.६ (अ) खालीलप्रमाणे समाविष्ट करण्यात येईलः

“१४.६(ए) मुक्त प्रवेश व्यवहारांच्या वेगवेगळ्या संयोगासाठी पारेषण आकार आणि वहन आकार आणि पारेषण हानि आणि वहन हानि खालील तक्त्यात दाखविल्याप्रमाणे लागू राहीलः

राज्यांतर्गत मुक्त प्रवेशाच्या वहन व्यवहारासाठी लागू असलेले वहन आकार*

| लागू असलेल्या वहन आकारासाठी तक्ता | | रु. प्रति युनिट | राज्यांतर्गत मुक्त प्रवेश | एम(डब्ल्युसी)३३ | एम(डब्ल्युसी)२२ | एम(डब्ल्युसी)११ | टी(डब्ल्युसी) उच्च दाब | ए (डब्ल्युसी) उच्च दाब |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अंतःक्षेपण | आय(१) | आय(२) | आय(३) | आय(४) | आय(५) | आय(६) |
| रु. प्रति युनिट | वीज खेचणी | | राज्यांतर्गत मुक्त प्रवेश ३३ केव्ही च्या वर | महावितरण कंपनी_३३ केव्ही | महावितरण कंपनी_२२ केव्ही | महावितरण कंपनी_११ केव्ही | टीपीसी_उच्च दाब | एईएल_उच्च दाब |
| राज्यांतर्गत मुक्त प्रवेश (डब्ल्युसी ) | डी (१) | राज्यांतर्गत मुक्त प्रवेश ३३ केव्हीच्या वर | निरंक वहन आकार | एम(डब्ल्युसी)३३ | एम(डब्ल्युसी)२२ | एम(डब्ल्युसी)११ | टी(डब्ल्युसी) उच्च दाब | ए (डब्ल्युसी) उच्च दाब |
| महावितरण कंपनी (डब्ल्युसी)३३ | डी (२) | महावितरण कंपनी_३३ केव्ही | एम(डब्ल्युसी)३३ | एम(डब्ल्युसी)३३ | एम(डब्ल्युसी)२२ | एम(डब्ल्युसी)११ | टी(डब्ल्युसी) उच्च दाब + एम(डब्ल्युसी)३३ | ए (डब्ल्युसी) उच्च दाब + एम(डब्ल्युसी)३३ |
| महावितरण कंपनी (डब्ल्युसी )२२ | डी (३) | महावितरण कंपनी_२२ केव्ही | एम(डब्ल्युसी)२२ | एम(डब्ल्युसी)२२ | एम(डब्ल्युसी)२२ | एम(डब्ल्युसी)११ | टी(डब्ल्युसी) उच्च दाब + एम(डब्ल्युसी)२२ | ए (डब्ल्युसी) उच्च दाब + एम(डब्ल्युसी)२२ |
| महावितरण कंपनी (डब्ल्युसी)११ | डी (४) | महावितरण कंपनी_११ केव्ही | एम(डब्ल्युसी)११ | एम(डब्ल्युसी)११ | एम(डब्ल्युसी)११ | एम(डब्ल्युसी)११ | टी(डब्ल्युसी) उच्च दाब + एम(डब्ल्युसी)११ | ए (डब्ल्युसी) उच्च दाब + एम(डब्ल्युसी)११ |
| टीपीसी (डब्ल्युसी) उच्च दाब | डी (५) | टीपीसी_उच्च दाब | टी(डब्ल्युसी) उच्च दाब | एम(डब्ल्युसी)३३ + टी(डब्ल्युसी) उच्च दाब | एम(डब्ल्युसी)२२ + टी(डब्ल्युसी) उच्च दाब | एम(डब्ल्युसी)११ + टी(डब्ल्युसी) उच्च दाब | टी(डब्ल्युसी) उच्च दाब | ए (डब्ल्युसी) उच्च दाब + टी(डब्ल्युसी) उच्च दाब |
| ए(वहन आकार) उच्च दाब | डी (६) | एईएल_उच्च दाब | ए (डब्ल्युसी) उच्च दाब | एम(डब्ल्युसी)३३ + ए (डब्ल्युसी) उच्च दाब | एम(डब्ल्युसी)२२ + ए (डब्ल्युसी) उच्च दाब | एम(डब्ल्युसी)११ + ए (डब्ल्युसी) उच्च दाब | टी(डब्ल्युसी) उच्च दाब + ए (डब्ल्युसी) उच्च दाब | ए (डब्ल्युसी) उच्च दाब |

जेथे,

| परिभाषिक नामकरण | मान्यताप्राप्त वहन आकार (डब्ल्युसी) |
|---|---|
| महावितरण कंपनी_३३ केव्ही | एम(डब्ल्युसी)३३ |
| महावितरण कंपनी_२२ केव्ही | एम(डब्ल्युसी)२२ |
| महावितरण कंपनी_११ केव्ही | एम(डब्ल्युसी)११ |
| टीपीसी_उच्च दाब | टी(डब्ल्युसी) उच्च दाब |
| एईएल_उच्च दाब | ए (डब्ल्युसी) उच्च दाब |

टीपः वरील वहन आकारां व्यतिरिक्त, वीज वहनाच्या प्रयोजनासाठी राज्यांतर्गत पारेषण यंत्रणा वापरण्यात आल्यास मुक्त प्रवेश वहन व्यवहारांवर पारेषण आकार लागू राहतील.

*वरील तक्त्याचे स्पष्टीकरण:*

| वहन आकारासाठी तक्ता | | रु. प्रति युनिट | राज्यांतर्गत मुक्त प्रवेश | एम(डब्ल्युसी)३३ | एम(डब्ल्युसी)२२ | एम(डब्ल्युसी)११ | टी(डब्ल्युसी… दाब |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अंतःक्षेपण | आय(१) | आय(२) | आय(३) | आय(४) | आय(… |
| रु. प्रति युनिट | वीज खेचणी | | राज्यांतर्गत मुक्त प्रवेश ३३ केव्ही च्या वर | महावितरण कंपनी_३३ केव्ही | महावितरण कंपनी_२२ केव्ही | महावितरण कंपनी_११ केव्ही | टीपीसी_उ… |
| राज्यांतर्गत मुक्त प्रवेश (डब्ल्युएल) | डी (१) | राज्यांतर्गत मुक्त प्रवेश ३३ केव्हीच्या वर | - | ०.१५ | ०.३८ | ०.७८ | १.४… |
| एम(डब्ल्युएल) | डी (२) | महावितरण कंपनी_३३ केव्ही | ०.१५ | ०.१५ | ०.३८ | ०.७८ | १.६… |
| एम(डब्ल्युएल) | डी (३) | महावितरण कंपनी_२२ केव्ही | ०.३८ | ०.३८ | ०.३८ | ०.७८ | १.८… |
| एम(डब्ल्युएल) | डी (४) | महावितरण कंपनी_११ केव्ही | ०.७८ | ०.७८ | ०.७८ | ०.७८ | २.२… |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **टी(डब्ल्युएल) उच्च दाब** | **डी** (५) | **टीपीसी_उच्च दाब** | १.४६ | १.६१ | १.८४ | २.२४ | १.४ |
| **ए (डब्ल्युसी) उच्च दाब** | **डी** (६) | **एईएल_उच्च दाब** | ०.७८ | ०.९३ | १.१६ | १.५६ | २.२ |

*जेथे,*

| आकार***** | मान्यताप्राप्त वहन आकार (डब्ल्युसी) |
|---|---|
| महावितरण कंपनी_३३ केव्ही | ०.१५ |
| महावितरण कंपनी_२२ केव्ही | ०.३८ |
| महावितरण कंपनी_११ केव्ही | ०.७८ |
| टीपीसी_उच्च दाब (३३ केव्ही/११केव्ही) | १.४६ |
| एईएल_उच्च दाब (११ केव्ही) | ०.७८ |

***आर्थिक वर्ष २०१८-१९ साठी मध्यावधी आढाव्याच्या आदेशानुसार मान्यताप्राप्त आकार**

टीपः वरील वहन आकारां व्यतिरिक्त, वीज वहनाच्या प्रयोजनासाठी राज्यांतर्गत पारेषण यंत्रणा वापरण्यात आल्यास मुक्त प्रवेश वहन व्यवहारांवर पारेषण आकार लागू राहतील.

**लागू असलेल्या वहन हानिचे आकार**

| **वहन हानिसाठी तक्ता** | **%हानि** | **राज्यांतर्गत मुक्त प्रवेश** | **एम(डब्ल्युसी)३३** | **एम(डब्ल्युसी)२२** | **एम(डब्ल्युसी)११** | **टी(डब्ल्युसी) उच्च दाब** | **ए (डब** |
|---|---|---|---|---|---|---|---|

| | | अंत:क्षेपण | आय(१) | आय(२) | आय(३) | आय(४) | आय(५) | अ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **% हानि** | **वीज खेचणी** | | **राज्यांतर्गत मुक्त प्रवेश ३३ केव्ही च्या वर** | **महावितरण कंपनी_३३ केव्ही** | **महावितरण कंपनी_२२ केव्ही** | **महावितरण कंपनी_११ केव्ही** | **टीपीसी_उच्च दाब** | **एईएल_** |
| **राज्यांतर्गत मुक्त प्रवेश (डब्ल्युएल)** | **डी (१)** | **राज्यांतर्गत मुक्त प्रवेश ३३ केव्हीच्या वर** | - | एम(डब्ल्युएल) ३३ | एम(डब्ल्युएल) २२ | एम(डब्ल्युएल) ११ | टी(डब्ल्युएल) उच्च दाब | ए(डब्ल् |
| **एम(डब्ल्युएल) ३३** | **डी (२)** | **महावितरण कंपनी_३३ केव्ही** | एम(डब्ल्युएल) ३३ | एम(डब्ल्युएल) ३३ | एम(डब्ल्युएल) २२ | एम(डब्ल्युएल) ११ | टी(डब्ल्युएल) उच्च दाब + एम(डब्ल्युएल) ३३ | ए (डब्ल द एम(ड |
| **एम(डब्ल्युएल) २२** | **डी (३)** | **महावितरण कंपनी_२२ केव्ही** | एम(डब्ल्युएल) २२ | एम(डब्ल्युएल) २२ | एम(डब्ल्युसी)२२ | एम(डब्ल्युसी)११ | टी(डब्ल्युएल) उच्च दाब + एम(डब्ल्युएल) २२ | ए (डब्ल द एम(ड |
| **एम(डब्ल्युएल) ११** | **डी (४)** | **महावितरण कंपनी_११ केव्ही** | एम(डब्ल्युएल) ११ | एम(डब्ल्युएल ११ | एम(डब्ल्युएल)११ | एम(डब्ल्युएल ११ | टी(डब्ल्युएल) उच्च दाब + एम(डब्ल्युएल) ११ | ए (डब्ल द एम(ड |
| **टी(डब्ल्युएल) उच्च दाब** | **डी (५)** | **टीपीसी_उच्च दाब** | टी(डब्ल्युएल) उच्च दाब | एम(डब्ल्युएल)३३ + टी(डब्ल्युएल) उच्च दाब | एम(डब्ल्युसी)२२ + टी(डब्ल्युएल) उच्च दाब | एम(डब्ल्युएल ११ + टी(डब्ल्युएल) उच्च दाब | टी(डब्ल्युएल) उच्च दाब | ए (डब्ल द टी(डब्ल |
| **ए (डब्ल्युसी) उच्च दाब** | **डी (६)** | **एईएल_उच्च दाब** | ए (डब्ल्युएल) उच्च दाब | एम(डब्ल्युएल)३३ + ए (डब्ल्युएल) उच्च दाब | एम(डब्ल्युएल)२२ + ए(डब्ल्युएल) उच्च दाब | एम (डब्ल्युएल) ११ + ए (डब्ल्युएल) उच्च दाब | टी(डब्ल्युएल) उच्च दाब + ए (डब्ल्युएल) उच्च दाब | ए (डब्ल्यु दाब |

जेथे,

| परिभाषिक नामकरण | मान्यताप्राप्त वहन आकार (डब्ल्युएल) |
|---|---|

| | |
|---|---|
| महावितरण कंपनी_३३ केव्ही | एम(डब्ल्युएल)३३ |
| महावितरण कंपनी_२२ केव्ही | एम(डब्ल्युएल)२२ |
| महावितरण कंपनी_११ केव्ही | एम(डब्ल्युएल)११ |
| टीपीसी_उच्च दाब | टी(डब्ल्युएल)उच्च दाब |
| एईएल_उच्च दाब | ए(डब्ल्युएल)उच्च दाब |

टीपः वरील वहन हानि व्यतिरिक्त, वीज वहनाच्या प्रयोजनासाठी राज्यांतर्गत पारेषण यंत्रणा वापरण्यात आल्यास मुक्त प्रवेश वहन व्यवहारांवर पारेषण हानि लागू राहील.

*वरील तक्त्याचे स्पष्टीकरण:*

| **वहन हानिसाठी तक्ता** | | **%हानि** | **राज्यांतर्गत मुक्त प्रवेश** | **एम(डब्ल्युसी)३३** | **एम(डब्ल्युसी)२२** | **एम(डब्ल्युसी)११** | **टी(डब्ल्युसी) उच्च दाब** | **ए (डब्ल्युसी** <br> **उच्च दा** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | **अंत:क्षेपण** | **आय**$_{(१)}$ | **आय**$_{(२)}$ | **आय**$_{(३)}$ | **आय**$_{(४)}$ | **आय**$_{(५)}$ | **आय**$_{(६)}$ |
| **% हानि** | **वीज खेचणी** | | **राज्यांतर्गत मुक्त प्रवेश ३३ केव्ही च्या वर** | **महावितरण कंपनी_३३ केव्ही** | **महावितरण कंपनी_२२ केव्ही** | **महावितरण कंपनी_११ केव्ही** | **टीपीसी_उच्च दाब** | **एईएल_उ** <br> **दाब** |
| **एम(डब्ल्युएल) ३३** | **डी** $_{(१)}$ | **राज्यांतर्गत मुक्त प्रवेश ३३ केव्हीच्या वर** | - | ६.००% | ७.५०% | ९.००% | ०.९०% | ०.५२% |
| **एम(डब्ल्युएल) २२** | **डी** $_{(२)}$ | **महावितरण कंपनी_३३ केव्ही** | ६.००% | ६.००% | ७.५०% | ९.००% | ६.९०% | ६.५२% |
| **एम(डब्ल्युएल) ११** | **डी** $_{(३)}$ | **महावितरण कंपनी_२२ केव्ही** | ७.५०% | ७.५०% | ७.५०% | ९.००% | ८.४०% | ८.०२% |
| **टी(डब्ल्युएल) उच्च दाब** | **डी** $_{(४)}$ | **महावितरण कंपनी_११ केव्ही** | ९.००% | ९.००% | ९.००% | ९.००% | ९.९०% | ९.५२% |
| **ए (डब्ल्युसी) उच्च दाब** | **डी** $_{(५)}$ | **टीपीसी_उच्च दाब** | ०.९०% | ६.९०% | ८.४०% | ९.९०% | ०.९०% | १.४२% |
| **एम(डब्ल्युएल) ३३** | **डी** $_{(६)}$ | **एईएल_उच्च दाब** | ०.५२% | ६.५२% | ८.०२% | ९.५२% | १.४२% | ०.५२% |

जेथे,

| **परिभाषिक नामकरण*** | **मान्यताप्राप्त वहन आकार (डब्ल्युएल)** |
|---|---|
| महावितरण कंपनी_३३ केव्ही | ६.००% |
| महावितरण कंपनी_२२ केव्ही | ७.५०% |
| महावितरण कंपनी_११ केव्ही | ९.००% |
| टीपीसी_उच्च दाब | ०.९०% |
| एईएल_उच्च दाब | ०.५२% |

***आर्थिक वर्ष २०१८-१९ साठी मध्यावधी आढाव्याच्या आदेशानुसार मान्यताप्राप्त हानिची पातळी उदाहरणार्थाच्या प्रयोजनासाठी**

टीपः वरील वहन हानि व्यतिरिक्त, वीज वहनाच्या प्रयोजनासाठी राज्यांतर्गत पारेषण यंत्रणा वापरण्यात आल्यास मुक्त प्रवेश वहन व्यवहारांवर पारेषण हानि लागू राहील.

डी. नवीन खंड १४.१० खालीलप्रमाणे समाविष्ट करण्यात येईलः

"१४.१०. ऊर्जा क्रेडीटच्या समायोजनासाठी प्राधान्यः

मुक्त प्रवेश ग्राहकांनी वेगवेगळ्या स्त्रोतांपासून केलेल्या विजेच्या खेचणीचे समायोजन खाली देण्यात आलेल्या कमी प्राधान्य क्रमाने राहील आणि लागू असलेल्या हानिचे समायोजन केल्यानंतर, प्रत्येक काल-गटासाठी त्याची अंमलबजावणी करण्यात येईल.

अ) नूतनशील ऊर्जा निर्माते

ब) स्व-वापरासाठीचा निर्मिती प्रकल्प

क) बँक केलेली ऊर्जा

ड) दीर्घ-कालिन द्विपक्षीय खरेदी

इ) मध्यम-कालिन मुक्त प्रवेश

एफ) पॉवर एक्स्चेंज व्यवहारांसह अल्प-कालिन आंतर-राज्य मुक्त प्रवेश

जी) अल्प-कालिन आंतर-राज्य मुक्त प्रवेश

एच) वितरण परवानाधारक

परंतु असे की, एकाच वर्गवारीसाठी एका पेक्षा अधिक स्त्रोतांकडून जमा केलेल्या ऊर्जेच्या बाबतीत अशा स्त्रोतांपासून करारबध्द केलेल्या निर्मिती क्षमतेच्या यथाप्रमाण तत्त्वावर अशा ऊर्जेचे समायोजन करण्यात येईल."

ई. नवीन खंड १४.११ खालीलप्रमाणे समाविष्ट करण्यात येईलः

**"१४.११. पॉवर फॅक्टर प्रोत्साहन-अधिदान/पॉवर फॅक्टरच्या दंडाची उपलब्धताः**

महिन्याभरात बॅन्क्ड केलेल्या ऊर्जेचे आणि प्रत्यक्ष मुक्त प्रवेशाच्या वापराचे समायोजन केल्यानंतर, वितरण परवानाधारकाकडून मुक्त प्रवेश ग्राहकाला आणि स्व-वापरासाठीच्या उपयोगकर्त्याला पुरविण्यात आलेल्या केवळ नक्त ऊर्जेसाठी वीज दराच्या आदेशाच्या वीज दर वेळापत्रकामध्ये विनिर्दिष्ट केल्यानुसार पॉवर फॅक्टर प्रोत्साहन-अधिदान मिळण्याचा हक्क किंवा पॉवर फॅक्टरच्या दंडाची वसुली, जसे असेल तसे, लागू राहील."

## १०. मुख्य विनियमांच्या विनियम १६ मध्ये सुधारणाः

विद्यमान विनियम १६.३ मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येईलः

"१६.३ नूतनशील ऊर्जेच्या दराचे नियमन करणाऱ्या आयोगाच्या विनियमांमध्ये "अनिश्चित वीज" निर्मिती करणारा म्हणून ठरविलेल्या नूतनशील ऊर्जा निर्मिती प्रकल्पाचे काल व परिमाण निर्धारण (शेड्युलिंग) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (सौर आणि पवन ऊर्जा निर्मितीकरिता पूर्वानुमान, काल व परिमाण निर्धारण (शेड्युलिंग) आणि तफावतीची हिशोबपूर्ती) विनियम, २०१८ नुसार करण्यात येईल."

**११. मुख्य विनियमांच्या विनियम १७ मध्ये सुधारणाः**

विद्यमान विनियम १७.८ च्या खाली आणि विद्यमान विनियम १७.९च्या वर नवीन खंड १७.९ खालीलप्रमाणे समाविष्ट करण्यात येईलः

"१७.९ बहुविध निर्मिती संच असलेली निर्मिती केंद्रे ज्यामध्ये एक किंवा अधिक संच स्व-वापरासाठीच्या मार्गाने करारबध्द करण्यात येतात, अशी निर्मिती कंपनी या विनियमांच्या अधिसूचनेपासून सहा महिन्यांच्या आत, नोडल एजन्सी आणि/किंवा एमएसएलडीसीने ठरवून दिलेल्या आवश्यकतेनुसार, स्वतःच्या खर्चाने विशेष ऊर्जा मीटर्स बसविल.

परंतु असे की, बसविण्यात आलेले विशेष ऊर्जा मीटर्स कोणत्याही वेळी वितरण परवानाधरक किंवा एमएसएलडीसीला पर्यवेक्षणासाठी उपलब्ध असतील;

परंतु आणखी असे की, पारेषण किंवा वितरण यंत्रणेशी जोडलेली अशी निर्मिती केंद्रे, जसे असेल तसे, वितरण परवानाधारक आणि/किंवा एमएसएलडीसीने ठरवून दिलेल्या तांत्रिक वैशिष्ट्यांनुसार नियंत्रण केंद्राशी त्यांची एकात्मता साधण्यासाठी लागणाऱ्या संपर्क व्यवस्थेचा खर्च स्वतः करतील."

**१२. मुख्य विनियमांच्या विनियम १८ मध्ये सुधारणाः**

विनियम १८.१.२ चे विद्यमान परंतुक खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येईलः

**"१८.१.२ राज्यांतर्गत पारेषण हानिः**

परंतु असे की, ऊर्जेची हिशोबपूर्ती राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेमध्ये मान्यता दिलेल्या हानिच्या आधारावर करण्यात येईल."

**१३. मुख्य विनियमांच्या विनियम १९ मध्ये सुधारणाः**

**ए.** विनियम १९.१ चे विद्यमान परंतुक खालीलप्रमाणे बदलण्यात येईलः

परंतु असे की, “महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (तफावतीच्या हिशोबपूर्तीची कार्यपध्दती आणि संबंधित बाबी) विनियम, २०१९ नुसार अधिसूचना अंमलात येण्याच्या दिनांकापर्यंत, राज्य पूलमध्ये सहभागी असलेल्या मुक्त प्रवेश ग्राहक, निर्मिती केंद्रे आणि परवानाधारकांना अंतिम संतुलन आणि हिशोबपूर्ती पध्दतीमध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या ऊर्जा संतुलन आणि हिशोबपूर्तीच्या तरतुदी किंवा आयोगाकडून विनिर्दिष्ट करण्यात येईल अशी अन्य पध्दत, लागू राहील.

बी. **विनियम १९.१ मध्ये वर प्रस्तावित केलेल्या सुधारणेच्या खाली नवीन परंतुकाची भर घालण्यात येईलः**

“परंतु आणखी असे की, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (तफावतीच्या हिशोबपूर्तीची कार्यपध्दती आणि संबंधित बाबी) विनियम, २०१९ नुसार प्रभावी दिनांकानंतर, तफावतीचे लेखे ठेवण्याच्या अटी आणि तफावतीची हिशोबपूर्ती महाराष्ट्रासाठीच्या तफावतीच्या हिशोबपूर्तीच्या कार्यपध्दतीचे नियमन करणाऱ्या विनियमांनुसार करण्यात येईल.”

सी. विद्यमान विनियम १९.२ च्या शीर्षकामध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येईलः

“१९.२. अंशतः मुक्त प्रवेश ग्राहक किंवा अंशतः मुक्त प्रवेश ग्राहकांच्या वतीने परवानाधारक वीज व्यापाऱ्याच्या संबंधात वीज खेचण्याच्या ठिकाणी ऊर्जेची हिशोबपूर्तीः”

डी. विद्यमान विनियम १९.२.१ खालीलप्रमाणे बदलण्यात येईलः

**१९.२.१ ज्यादा खेचलेली वीजः**

**अंशतः** मुक्त प्रवेश ग्राहकाने खेचलेल्या ज्यादा विजेची हिशोबपूर्ती खालील २ पैकी उच्च असलेल्या पर्यायाने करण्यात येईल-

(एक) यंत्रणा सर्वोच्च किंमत (सिस्टम मार्जिनल प्राईस- ‘एसएमपी’) अधिक अन्य आनुषंगिक आकार (नक्त अनिर्धारित आंतरबदल (‘युआय’) आकार, अतिरिक्त युआय आकार) किंवा महाराष्ट्रात वेळोवेळी कार्यरत असलेल्या पध्दतीखाली तफावतीच्या हिशोबपूर्तीच्या कार्यपध्दतीनुसार निश्चित करण्यात आलेले अन्य कोणतेही तफावतीसाठीचे आकार किंवा,

इ. विद्यमान विनियम १९.२.२ खालीलप्रमाणे बदलण्यात येईलः

“ १९.२.२ कमी खेचलेली वीजः

अंशतः मुक्त प्रवेश ग्राहकाने कमी वीज खेचल्यास त्याला वितरण परवानाधारकाकडून कोणतेही आकार अदा केले जाणार नाहीत.

एफ. विद्यमान विनियम १९.३.१(ए) आणि १९.३.१ (बी) खालीलप्रमाणे बदलण्यात येतीलः

“१९.३.१ विजेचे जादा अंतःक्षेपणः

(अ) निर्मिती कंपनीने शेड्युलमधील अंतःक्षेपणापेक्षा केलेल्या ज्यादा विजेच्या अंतःक्षेपणामुळे जर ग्रिडचा फायदा होत असेल तर अशा ज्यादा वीज अंतःक्षेपणाची हिशोबपूर्ती ही, तफावतीच्या हिशोबपूर्तीच्या कार्यपध्दती अंतर्गत लागू असलेल्या तफावतीसाठीच्या आकाराने किंवा यंत्रणा सर्वोच्च किंमत (एसएमपी) अधिक अन्य आनुषंगिक आकाराने (नक्त युआय आकार, अतिरिक्त युआय आकार) किंवा महाराष्ट्रात प्रचलित असलेल्या पध्दतीखालील राज्यांतर्गत एबीटी च्या अन्य कोणत्याही हिशोबपूर्तीसाठीच्या आकाराने किंवा वितरण परवानाधारकाच्या, द्रवरुप इंधनावर आधारित वीज निर्मिती वगळून अन्य स्रोतांकडील नूतनशील वीज खरेदीच्या बंधनाच्या पूर्ततेसह दीर्घ-कालिन वीज खरेदीच्या भारांकित सरासरी दराने, जे कमी असेल त्यानुसार, करण्यात येईल.

(ब) जर असे जादा अंतःक्षेपण ग्रिडला घातक असेल तर विजेच्या अशा जादा अंतःक्षेपणाकरिता मुक्त प्रवेश निर्मिती कंपनी, तफावतीच्या हिशोबपूर्तीच्या कार्यपध्दती अंतर्गत लागू असलेले तफावतीसाठीचे आकार किंवा यंत्रणा सर्वोच्च किंमत (एसएमपी) अधिक अन्य आनुषंगिक आकार (नक्त युआय आकार, अतिरिक्त युआय) किंवा महाराष्ट्रात प्रचलित असलेल्या पध्दतीखालील राज्यांतर्गत एबीटी च्या अन्य कोणत्याही हिशोबपूर्तीसाठीच्या आकार, जे जास्त असेल ते, राज्य पूल मध्ये भरणा करील.

जी. विद्यमान विनियम १९.३.२ मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येईलः

“१९.३.२ विजेचे कमी अंतःक्षेपण :

मुक्त प्रवेश निर्मिती कंपनीने शेड्युलपेक्षा कमी अंतःक्षेपण केल्यास, त्याची भरपाई ग्रिडमधून करण्यात येईल व त्याची किंमत, तफावतीच्या हिशोबपूर्तीच्या कार्यपध्दती अंतर्गत लागू असलेल्या तफावतीसाठीच्या आकाराने किंवा यंत्रणा सर्वोच्च किंमत (एसएमपी) अधिक अन्य आनुषंगिक आकाराने (नक्त युआय आकार, अतिरिक्त युआय) ने किंवा महाराष्ट्रात प्रचलित असलेल्या पध्दतीखाली ठरवून दिलेल्या राज्यांतर्गत एबीटी च्या अन्य कोणत्याही हिशोबपूर्तीसाठीच्या आकाराने, जे जास्त असेल ते, मुक्त

प्रवेश निर्मिती कंपनीकडून वितरण परवानाधारकाला अदा करण्यात येईल. आणि मुक्त प्रवेश निर्मिती केंद्राच्या जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी प्रादेशिक भार प्रेषण केंद्र (आरएलडीसी) आणि/ किंवा एमएसएलडीसीने, वितरण परवानाधारकाला देय म्हणून ठरवून दिलेला कोणताही अतिभार (कंजेस्शन) आकार देखील.

परंतु असे की, कोणतेही निर्मिती केंद्र जर राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेला थेट जोडलेले असेल तर त्याच्यावर वितरण हानीचा भार टाकण्यात येणार नाही.

परंतु आणखी असे की, जर विजेचे कमी अंतःक्षेपण सतत दोन दिवस होत राहिले तर, एमएसएलडीसी शेड्युलमध्ये सुधारणा करण्यासाठी निर्मिती केंद्राला नोटीस देईल.

परंतु असेही की, जर निर्मिती केंद्र मुक्त प्रवेश शेड्युलप्रमाणे विजेचे अंतःक्षेपण करु शकले नाही आणि त्याचे शेड्युलमध्ये जर तातडीने सुधारणा केली नाही तर, निर्मिती केंद्र, यंत्रणा सर्वोच्च किंमतीने (एमएमपी) अधिक अन्य आनुषंगिक आकाराच्या (नक्त युआय आकार, अतिरिक्त युआय) किंवा महाराष्ट्रात कार्यरत असलेल्या राज्यांतर्गत तफावतीच्या हिशोबपूर्तीच्या कार्यपध्दती अंतर्गत ठरवून देण्यात आलेल्या अन्य कोणत्याही राज्यांतर्गत तफावत हिशोबपूर्ती आकाराच्या, दुप्पट दंड भरण्यास, जबाबदार राहील; असे असले तरीही, निर्मिती केंद्र संपूर्ण कालावधीकरिता पूर्ण राखीव क्षमतेसाठी मुक्त प्रवेश आकार अदा करण्यास जबाबदार राहील.

एच. विद्यमान विनियम १९.३.३ मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येईलः

“१९.३.३ महाराष्ट्रातील निर्मिती केंद्र जर तफावतीच्या हिशोबपूर्तीच्या कार्यपध्दतीनुसार राज्य पूल सहभागीदार म्हणून घोषित करण्यात आले तर खालील बाबी लागू राहतील :

(अ) कोणत्याही १५ मिनिटाच्या काल-गटात घोषित क्षमतेच्या १०५ टक्क्यापर्यंतची कोणतीही निर्मिती जर तिची एका दिवसातील एकूण सरासरी ही घोषित सरासरी क्षमतेच्या १०१ टक्क्यापर्यंत जात असेल तर ती गेमींग म्हणून मानण्यात येणार नाही आणि निर्मिती केंद्राला शेड्युलमधील निर्मितीच्या घोषित क्षमतेपेक्षा जास्त झालेल्या वीज निर्मितीसाठी, यंत्रणा सर्वोच्च किंमत (एमएमपी) अधिक अन्य आनुषंगिक आकार (नक्त युआय आकार, अतिरिक्त युआय) म्हणून निश्चित केलेले युआय आकार किंवा महाराष्ट्रात कार्यरत असलेल्या तफावतीच्या हिशोबपूर्तीच्या कार्यपध्दती अंतर्गत ठरवून देण्यात आलेले अन्य कोणतेही तफावतीसाठीचे आकार किंवा निर्मितीचा सर्वात कमी अस्थिर खर्च, जे कमी असेल ते, मिळण्याचा हक्क राहील.

**१४. मुख्य विनियमांच्या विनियम २० मध्ये सुधारणाः**

(ए) विद्यमान विनियम २०.१ मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येईल आणि त्यामध्ये नवीन परंतुकाची भर घालण्यात येईलः

"२०.१ नूतनशील उर्जेच्या दरांचे नियमन करणाऱ्या विनियमांत आयोगाने अनिश्चित वीज निर्माता म्हणून ठरविलेल्या नूतनशील उर्जा निर्मिती केंद्रामधून (उदा. पवन, सौर आणि पवन व सौर यांचा समावेश असलेली हायब्रिड नूतनशील ऊर्जा निर्मिती केंद्रे) जर मुक्त प्रवेश ग्राहकाने वीज प्राप्त करुन घेतली तर त्याला विनियम १९.३ लागू असणार नाही.

परंतु असे की, अ-निश्चित विजेच्या बाबतीत (उदा. पवन, सौर आणि पवन व सौर यांचा समावेश असलेली हायब्रिड नूतनशील ऊर्जा निर्मिती केंद्रे) अंतःक्षेपणाच्या ठिकाणच्या तफावतीच्या हिशोबपूर्तीचे नियमन महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (सौर आणि पवन ऊर्जा निर्मितीकरिता पूर्वानुमान, काल व परिमाण निर्धारण (शेड्युलिंग) आणि तफावतीची हिशोबपूर्ती) विनियम, २०१८ नुसार करण्यात येईल."

(बी) विद्यमान विनियम २०.२ मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येईलः

"२०.२ नुतनशील उर्जा निर्मिती केंद्रातील समायोजनानंतर अनिश्चित वीज निर्मितीपैकी शिल्लक उर्जा, त्यानंतरच्या परिच्छेदामध्ये ठरवून दिलेल्या अटींच्या अधीन राहून, वितरण परवानाधारकाकडे बँक करण्यात येईल.

(सी) विद्यमान विनियम २०.३ वगळण्यात आले आहेः

~~"२०.३ बँकिंग वर्ष आर्थिक वर्षाप्रमाणे एप्रिल ते मार्च असे राहील."~~

(डी) विद्यमान विनियम २०.४ ला २०.३ म्हणून पुनःअंकित करण्यात येईल आणि त्यामध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येईल.

"२०.३ फक्त एक महिन्याच्या तत्त्वावर उर्जेचे बँकिंग करण्यात परवानगी देण्यात येईल.

परंतु असे की, बँक केलेल्या एनर्जीसाठीचे क्रेडीट **त्यानंतरच्या महिन्यांमध्ये घेण्याकरिता** परवानगी देण्यात येणार नाही आणि महिन्यादरम्यान बँक केलेल्या एनर्जीसाठीचे क्रेडीट त्याच महिन्यात समायोजित करण्यात येईल **राहील, अंतःक्षेपित केलेल्या उर्जेप्रमाणे ...**

(ई) विद्यमान विनियम २०.५ ला २०.४ म्हणून पुनःअंकित करण्यात येईल.

(एफ) विद्यमान विनियम २०.६ मध्ये सुधारणा करुन त्याला २०.५ म्हणून पुनःअंकित करण्यात येईल आणि विद्यमान परंतुकाच्या वर खालीलप्रमाणे नवीन परंतुकांची भर घालण्यात येईलः

"२०.५. महिन्याच्या शेवटी बँक केलेल्या ऊर्जेपैकी अविनियोगित ऊर्जा, नूतनशील ऊर्जा निर्मात्याने अशा महिन्यात प्रत्यक्ष केलेल्या निर्मितीच्या १० टक्केपर्यंत, वितरण परवानाधारकाने संबंधित नूतनशील ऊर्जा तंत्रज्ञानावर आधारीत नूतनशील ऊर्जेच्या प्राप्तीसाठी मागील वर्षी राज्यात पार पडलेल्या बोली **प्रक्रियेंतर्गत मिळालेला किमान वीज दर, किंवा संबंधित वितरण परवानाधारकाचा सरासरी वीज खरेदी दर, यापैकी जो कमी असेल त्याच्या सममूल्य दराने केलेली** मानीव खरेदी म्हणून विचारात घेण्यात येईल.

परंतु असे की, संबंधित नूतनशील ऊर्जा तंत्रज्ञानाच्या आधारावरील ऊर्जेच्या प्राप्तीसाठी मागील एक वर्षात बोली प्रक्रिया पार पडली नसल्यास, कोणत्याही नूतनशील ऊर्जा तंत्रज्ञानासाठी मागील काळात राज्यामध्ये पार पडलेल्या सर्वात अलीकडच्या बोली प्रक्रियेंतर्गत मिळालेला दर विचारात घेण्यात येईल.

परंतु असे की, वितरण ग्रिडमध्ये अंतःक्षेपित केलेली सर्व अविनियोगित बॅन्क्ड ऊर्जेची गणना वितरण परवानाधारकाच्या नूतनशील उर्जा खरेदीच्या बंधनाची पूर्तता करण्यासाठी, धरता येणार नाही आणि निर्मिती केंद्राला त्या मर्यादे इतकी नूतनशील उर्जा प्रमाणपत्रे मिळण्याचा हक्क राहणार नाही.

**१५. मुख्य विनियमांच्या विनियम ३१ मध्ये सुधारणाः**

विद्यमान विनियम ३१.१ मध्ये सुधारणा करण्यात येईल आणि विद्यमान परंतुकाच्या वर खालीलप्रमाणे नवीन परंतुकांची भर घालण्यात येईलः

"३१.१ राज्य पारेषण कंपनी, 'मुक्त प्रवेश संनियंत्रण आणि पुनर्विलोकन समिती' या नावाची एक समिती गठीत करील आणि त्यामध्ये खालील सदस्यांचा समावेश असेलः

ए) राज्य पारेषण कंपनीचा एक सदस्य

बी) महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राचा एक सदस्य

सी) राज्याची मालकी असलेल्या वितरण परवानाधारकाचा एक सदस्य

डी) खाजगी मालकी असलेल्या वितरण परवानाधारकाचा एक सदस्य, आणि

इ) आयोगाकडून त्यांच्या अधिका-यांमधून नामनिर्देशित केलेला एक सदस्य

परंतु असे की, ही समिती मुक्त प्रवेशाच्या प्रगतीचे संनियत्रण करील आणि या समितीची ६ महिन्यातून कमीत कमी एक बैठक घेण्यात येईल आणि त्यांच्या कार्यवाहीचा अर्ध-वार्षिक अहवाल सादर करील.

परंतु आणखी असे की, या विनियमांच्या तरतुदींच्या आणि या विनियमांच्या तरतुदींतर्गत विकसित झालेल्या नियम आणि कार्यपध्दतीच्या अंमलबजावणीचे मूल्यांकन करण्यासाठी आणि अंमलबजावणी दरम्यान निर्माण झालेल्या प्रश्नांवर उपाययोजनांची शिफारस करण्यासाठी जबाबदार राहील.

परंतु असे की, पुर्वीच्या विनियमांखाली गठीत करण्यात आलेली समिती जोपर्यंत या विनियमांखाली समिती गठीत करण्यात येत नाही तोपर्यंत पुढे चालू राहील.

**१६. मुख्य विनियमांच्या विनियम ३८ मध्ये सुधारणाः**

विद्यमान विनियम ३८.३ च्या पहिल्या आणि दुस-या परंतुकामध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येईलः

"परंतु असे की, वेळोवेळी सुधारणा करण्यात आल्याप्रमाणे या विनियमांतील विनियम २० मधील बँकींग बाबतच्या तरतुदी, देयक मागणीची व्याख्या, विनियम २६ मधील विजेचे अंतःक्षेपण करण्याच्या (इंजेक्शन) किंवा वीज खेचण्याच्या (ड्रॉअल) ठिकाणांतील बदल आणि विनियम ४.२ मधील करारांतर्गत, त्यामध्ये झालेल्या सुधारणांसह, मागणीत सुधारणा, या संबंधातील तरतुदी अशा प्रचलित असलेल्या मुक्त प्रवेश करार किंवा संविदांना लागू राहतील.

परंतु आणखी असे की, ग्राहक, निर्मिती केंद्र किंवा परवानाधारक ज्याने रद्द करण्यात आलेल्या विनियमांतर्गत महाराष्ट्रातील वितरण यंत्रणेत मुक्त प्रवेश मागण्यासाठी अर्ज केलेला असेल आणि ज्याच्या अर्जाची हे विनियम अंमलात येण्याच्या किंवा त्यातील सुधारणांच्या दिनांका रोजी छाननी चालू असेल त्याने पुन्हा अर्ज करण्याची गरज नाही आणि अशा अर्जाची छाननी अनुक्रमे या विनियमांच्या तरतुदींतर्गत किंवा या विनियमांमध्ये सुधारणा केलेल्या तरतुदींतर्गत करण्यात येईल."

दिनांक : -- मार्च, २०१९
ठिकाण : मुंबई

सचिव,
महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग